# पराक्रमी पाऱ्या

मुलांसाठी
अत्यंत मनोरंजक
दीर्घ कथा

म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : बा.वा.
दा. क्र. २८३१



BVBK-0402839

लेखक—
क.भा.माईणकर

२८३९
७।१।८३

# पराक्रमी पप्या

## मुलांसाठी अत्यंत मनोरंजक दीर्घकथा

: लेखक :

म. भा. माईणकर

२८३९ ७।१।८३

नवभारत प्रकाशन संस्था, मुंबई

BVBK-0402839

**प्रकाशक :**
प्रभाकर र. देसाई.
**नवभारत प्रकाशन संस्था**
रामदूत, दुसरा माळा,
डॉ. भालेराव मार्ग,
गिरगांव, मुंबई ४०० ००४.
दूरध्वनि : ३८८४७३०

**प्रथमावृत्ती :**
नोव्हेंबर, १९९१

**मुद्रक :**
**मनिषा प्र. देसाई,**
मायक्रोग्राफ,
भगवान भवन,
दादी संतुक लेन,
जगन्नाथ शंकर शेठ रोड,
मुंबई ४०० ००२.

**किंमत** : रु. ६/-

म. वं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
क्र. २८३९ दिनांक ९।८।८३
विभाग बा. वा.

: १ :

# ओळख

मला पहिल्यापासून कुत्र्याची भारी आवड. तशात गावात आलेल्या सर्कसच्या खेळात कुत्र्यांची अनेक कौशल्याची अन शहाणपणाची कामं पाहिल्यापासून तर आपणही एकादं छोटसं कुत्र्याचं पिल्लू आणून पाळावं. अन् त्यालाही अशीच कौशल्याची कामं शिकवावी असं फार फार वाटू लागलं. पण ते जमावं कसं? आमच्या आईला तर कुत्र्याचा भारी तिटकारा! वडलांनाही कुत्रं डोळयासमोर नको. त्यामुळे मला माझी हौस मनातल्या मनातच ठेवावी लागली.

याच सुमारास माझी वार्षिक परीक्षा होऊन मी पहिल्या क्रमांकानं दुसरी यत्ता पास झालो. त्यामुळे आता थोडं अनुकूल वातावरण निर्माण झालं होतं. दहाबारा दिवसांपूर्वी आमचा माळी हरबा जांभूळकर याच्या घरी त्याची चंपी कुत्री व्याली होती. तिला छानदारशी तीन पिलं झाली होती. ती तिन्ही पिलं एकाहून एक सरस होती. पण त्यातल्या त्यात करड्या कानांचं जे एक होतं ते माझ्या मनात फारच भरलं होतं. काय वाटेल ते करून ते बाळगण्यासाठी घरी आणायचं असं मी ठरविलं. हरबानं एकच नव्हे तर तीनही पिलं देण्याचं कबूल केलं; पण मी मात्र एकावरच समाधानी होतो.

त्यादिवशी आमच्याकडे बेळगावहून पाहुणी माणसं आली होती. ती फार चांगल्या पायगुणाची होती यात शंका नाही.. संध्याकाळी आम्ही घरातली सगळी माणसं पाहुण्यांशी गप्पागोष्टी करीत बसलो होतो. सहजच सर्कसचा विषय निघाला. मग गप्पांच्या ओघात पाहुण्यांनी आपल्या पाळलेल्या कुत्र्याविषयी एक एक मौजेच्या गोष्टी सांगितल्या. त्या ऐकून तर माझी कुत्र्याविषयीची हौस अनावर झाली अन् मी आईला म्हटलं,
''आई, आपणसुद्धा एक छानसं कुत्र्यांच पिल्लू आणूया ग पाळायला! हरबाच्या घरी त्याची कुत्री व्याली आहे. कित्ती कित्ती छान आहेत पिल्ल तिची!''

''नको - आपल्याला ती पिडा मुळीच नको! त्रास कोण काढील त्याचा? कुत्री काही फुकटची नाहीत. फार खस्ता काढाव्या लागतात त्यांच्या'' आई वैतागून म्हणाली.

मी आणखी थोडासा उत्साह धरून म्हटलं,

''मी करीन त्याचं सगळं काही. तुम्हाला त्याचा मुळीसुद्धा त्रास पडू देणार नाही. मग तर झालं? आणू का हरबाच्या घरनं एक पिल्लू? अं!''

मी अण्णांच्या चेहऱ्याकडे पाहिलं. माझा हट्ट पाहून त्यांना थोडसं हसूच येत होतं. ते पाहुण्यांकडे वळून म्हणाले,

''किती छांदिष्ट अन् खुळा मुलगा आहे! चांगली सायकल घेऊन दिलीय गेल्या महिन्यात तरी कुत्र्याचाच नाद घेऊन बसलाय!''

पण मग मला आणखी विशेष खटपट करावी लागली नाही. पाहुण्यांनीच अण्णांपाशी रदबदली करून मला हरबाच्या घरचे

पिल्लू आणण्याची परवानगी मिळवून दिली. कित्ती कित्ती आनंद झाला मला म्हणून सांगू!

दुसऱ्या दिवशी सकाळी मी हरबाच्या घरी जाऊन त्याच्याकडील मला हवे ते पिल्लू घेऊन आलो. मग माझ्या जमवून ठेवलेल्या खाऊच्या पैशातून चार रुपये खर्चून मी एक चामड्याचा पट्टा नि साखळी आणली नि त्याला ओटीवर एका खांबाला बांधून टाकलं. पण ते सुटून जाण्यासाठी एकसारखं अस्वस्थपणानं ओरडू लागलं. मग मी त्याला थोडी बिस्किटं नि दूध आणून दिलं; पण त्याकडे दुर्लक्ष करून त्यानं आपलं ओरडणं चालूच ठेवलं.

मला काहीच सुचेना. त्याचं ओरडणं ऐकून आई बाहेर आली नि माझ्याकडे खट्याळपणांनं पहात म्हणाली, ''काय दीपक, काय म्हणतात आपले पाहुणे? ओरडायला काय होतयं त्यांना?''

मी मनातनं थोडा खजील झालो; पण वरकरणी जोर आणून म्हणालो,

''आईसाहेब, आपल्याला काही म्हणत नाहीत पाहुणे. मी आहे इथं त्यांची उठा बस करायला.''

यावेळी मात्र मी त्या पिल्लावर फार नाराज झालो होतो. खूपखूप राग आला होता मला त्याचा. मी त्याला चांगलं खायला प्यायला दिलं तरी त्यानं असा आकांत काय म्हणून करावा?

बराच वेळपर्यंत ओरडल्यावर थकल्यामुळंच की काय मग ते स्वस्थ पडून राहिलं. शाळेची वेळ झाल्यामुळे मी ही शाळेत निघून गेलो. पण शाळेत अभ्यासाकडे लक्षच लागत नव्हत माझं.

एकसारखी त्या पिल्लाची काळजी वाटत होती. न जाणो, त्याच्या ओरडण्यानं वैतागून अण्णा त्याची हकालपट्टीसुद्धा करायचे!

मग संध्याकाळी शाळा सुटल्यावर मी माझ्या सोबत्यांना ते पिल्लू पाहाण्यासाठी घरी घेऊन आलो. सर्वांनाच ते खूप आवडलं. मग त्याचं नाव काय ठेवावं याचा आम्ही विचार करू लागलो. प्रथम अनेकांनी अनेक नावं सुचविली; पण शेवटी त्याचं 'पप्या' हे नाव एकमतानं मंजूर झाले.

आता त्याचं ओरडणंही कमी झालं होतं व मी पुन्हा दिलेलं दूध नि बिस्किटं खाल्ल्यावर तर त्याच्या अंगात चांगली हुषारी येऊन ते बागडायलाही लागलं होतं.

मी त्याच्यासमोर जाऊन त्याला 'पप्या पप्या, यू' असं म्हटलं तेव्हा तर ते उड्या मारीत मारीत पुढे येऊन माझ्या हाताशी खेळू लागलं.

## : २ :

## पप्याला पाहुणचार

पप्याला आमच्या घरी येऊन आता चारपाच दिवस झाले होते. प्रथम एकदोन दिवस त्याच्या ओरडण्याचा खूप त्रास झाला. मीही अगदी कंटाळून गेलो. आईनं तर त्याला दुसऱ्याच दिवशी दूर नेऊन सोडण्याचीही व्यवस्था केली होती; पण माझ्या शिकस्तीच्या प्रयत्नानं ते टळलं होतं. अन् पुढे साखळीनं बांधून

राहाण्याची सवय झाल्यावर तर त्याचं ओरडणंही नाहीस झालं.

माझा दिवसाचा बराचसा वेळ पप्याची काळजी घेण्यात जात असे. ठरलेल्या वेळी पप्याला भात, भाकर, दूध हे खाणं मिळेच, पण शंकरपाळी, बिस्किटं, लाडू, शिरा इत्यादी जिन्नसही मी माझ्या वाटणीतून काढून गुपचूप पप्याला मधूनमधून चारीत असे.

लवकरच पप्याची घरातल्या साऱ्या माणसांशी गट्टी जमली. अण्णांना मात्र त्याच्याकडे पाहायला फारशी सवडच मिळत नसे; पण धाकट्या छबीपासून स्वयंपाकीणबाई पर्यंत सर्वांचाच पप्या फार आवडता होऊन राहीला होता. आईचं मतही प्रथम प्रथम वाईट होतं; पण आता तो तिलाही थोडावेळ आवडू लागला होता.

मला तर पप्यावाचून जरासुद्धा करमत नसे. संध्याकाळी शाळेतून घरी येताच मी कंपाउंडच्या दारातूनच पप्याला हाक मारीत असे. माझी हाक ऐकताच पप्या धावत येऊन अंगावर उड्या घेत माझं स्वागत करी. मी सुद्धा त्याच्या डोक्यावरून, पाठीवरून मोठ्या प्रेमानं हात फिरवून त्याचं कौतुक करी. कधी कधी तर पप्या भारीच लाडात यायचा, अशाच एका वेळी त्यानं आपली जीभ माझ्या चेहऱ्यावरून फिरवून माझी फजीती केली होती.

त्यावेळी मला पप्याचा असा राग आला होता! त्याला तिथल्या तिथं चांगली शिक्षा करावी असं माझ्या मनांत आलं होतं; पण उगीच पप्याच्या मूर्खपणाचा गाजावाजा केल्यास आपली फजीती सर्वांना कळायची या भीतीनं मी तो विचार

अजिबात सोडला. मात्र एवढं खरं की त्या दिवसापासून मी त्याच्याशी जास्त लडिवाळपणा करायचं सोडून दिलं.

## : ३ :

## भलेबहाद्दर पप्या !

पप्या जसजसा वयानं वाढू लागला. तसा त्याचा खोडकरपणाही वाढू लागला. घरातल्या माणसांना तर त्याचा रोज उपसर्ग पोचत असेच; पण शेजाऱ्यापाजाऱ्यांनाही त्यानं सतावून सोडलं होतं. माझी सहामाही परीक्षा जवळ आली होती म्हणून मला अलिकडे त्याच्याकडे पाहायला जास्त वेळ मिळत नसे; पण परीक्षेतून मोकळा झाल्यावर त्याला कसरतीचे काही प्रयोग नि शिस्तीचे पाठ शिकवायचे असं मी मनाशी ठरवून टाकलं होतं.

एक दिवस संध्याकाळी मी शाळेतून घरी आल्यावर नेहमीप्रमाणं पप्याला हाक मारली. पण त्याचा कुठे पत्ताच नव्हता मी अन् माझा मित्र सुधीर असे मिळून आज त्याला बंदरावर उंच उडी शिकवायला घेऊन जाणार होतो. मग अगदी वैतागून मी पप्याची चौकशी करण्यासाठी घरात आईकडे गेलो.

का कुणास ठावूक, आई जरा रागातच होती. मला पाहाताच ती एकदम उसळून म्हणाली,

''अरे बाबा, ती नसती पीडा काय म्हणून आणून ठेवलीय

घरी? पहिल्यानं तुझ्या त्या कुतरड्याला गोणीत घालून दूर नेऊन सोड पाहू. अगदी अगदी छळवाद मांडलाय मेल्यानं!''

काय प्रकार आहे याचा उलगडाच होईना मला. अगदी बुचकळ्यात पडलो होतो मी. जरा भीतभीतच मी आईला विचारलं,

''असं झालंय् तरी काय? काय केलंय असं त्या पप्यान?''

''काय केलयं? विचार जाऊन त्या रखमाकाकूंनाच! मेल्यानं भंडावून सोडलंय सर्वांना.

मग मला आईकडूनच हळुहळू पप्यानं केलेला पराक्रम समजला. शेजारच्या रखमाकाकूंचं सोवळं भारी कडक. आज त्यांनी सोवळ्यातले पापड करायला घेतले होते. गेल्या सालीच त्यांच्या थोरल्या मुलीचं लग्न झालं होते. तिला देण्यासाठी यंदा त्यांनी जरा जास्त पापड करायला घेतले होते. दुपारी शेजारच्या बायका पापड करण्यासाठी त्यांच्या घरी जमल्या होत्या. आईही तिकडेच गेली होती. तिला जाताना पाहून पप्यानंही तिकडचा रस्ता धरला. पण तो का तिथं उपद्व्याप केल्याशिवाय स्वस्थ बसणार? माझघरात पापड लाटता लाटता बायकांच्या गप्पा अगदी रंगात आल्या होत्या. प्रथम थोडा वेळ दारात उभा राहून कूंऽऽ कूंऽऽ करीत पप्या आत शिरण्याची वाट पाहात होता. मध्येच कुणातरी बाईच्या धाकट्या मुलीनं 'पप्या' अशी हळूच हाक मारली. मग काय? टुणदिशी उडी मारून पप्या आत शिरलाच. सगळ्या बायकांची एकच धांदल उडाली. त्यांनी पप्याला लागलीच बाहेर पिटाळलं. पण त्यानं परातीतल्या एवढ्या मोठ्या पिठाला शिवून घोटाळा उडविलाच.

रखमाकाकूंनी आकाशपाताळ एक केलं. मग कुठले पापड नि कुठलं काय? आईला मात्र खट्टू होऊन घरी परतावं लागलं.

घरी आल्यावर आईन पप्याच्या चांगल्या दोन छड्या ओढल्या. तेव्हापासून त्यानं कुठं तोंड दडवलं होत कोण जाणे! पण आता माझा आवाज ऐकून तो अचानक रीतीनं कुठून तरी शेपटी जोरजोरानं हालवीत माझ्यासमोर आला. त्याला पाहाताच माझ्या तोंडून सहज उद्‌गार निघाले -- भले बहाद्दर पप्या!

: ४ :

## पप्याची प्रयोगशाळा

वर्षातल्या काही ठराविक दिवसात ठराविक खेळ साधारणपणे सर्वत्र खेळले जातात. आता पतंगाचे दिवस आले होते. संध्याकाळ झाली की मैदानात पतंग उडविणाऱ्यांची गर्दी होऊन पतंगांची 'काटाकाटी' मोठ्या चुरशीनं चालायची. त्यांच्यात मुलं तर असायचीच; पण कित्येक हौशी पोक्तीपुरवती माणसंही असत. गेल्या वर्षी अशीच 'काटाकाटी' लढविण्यात माझेही चारपाच पतंग कामी आले होते. आज मी एक मोठा पतंग विकत आणला होता. त्याच्याबरोबरच दीड रुपयाची भारी छडी (मांजा) आणली होती. आज दोनतीन तरी पतंग कापावयाचे अशा आनंदाच्या विचारात मी सकाळपासून होतो.

संध्याकाळी शाळा सुटली तसा तडक मी घरी आलो. आईनं

दिलेला खाऊ घाइघाईत मटकावून तसाच मैदानावर जायला निघालो. सुधीरही बाहेर माझी वाट पाहत उभा होता. त्याला जरावेळ थांबायला सांगून मी सकाळी अभ्यासाच्या खोलीत टेबलावर पतंग ठेवला होता तो आणण्यासाठी तिकडे गेलो. पण पाहातो तर काय? टेबलावर पतंग नाही.

'झाला काय बुवा पतंग?' असं पुटपुटत जिकडे तिकडे पतंग शोधू लागलो. स्वयंपाकघर धुंडाळलं देवघर पाहिलं अण्णांची खोलीही तपासली; पण पतंगाचा कुठेच पत्ता लागेना. अगदी चिडून गेलो मी, मग कपाटाच्या वरच्या बाजूवर, शेल्फवर जिकडे तिकडे पुन्हा पाहाणी केली. पण व्यर्थ!

शेवटी कुणीतरी मुद्दामच माझा पतंग लपवून ठेवला आहे अशी खात्री होऊन मी ज्याचा त्याचा संशय घेऊ लागलो. माझा धाकटा भाऊ चंदू याचा मला केव्हापासून संशय येत होता. ओटीवर येऊन तो मघापासून माझी धावपळ पाहात होता. मी त्याला दम देऊन विचारलं,

''चंद्या, माझा पतंग कुठे आहे? बोल, तू घेतलास की नाही?''

मला उत्तर देण्याऐवजी त्यानं रडक्या सुरात आईलाच हाका मारायला सुरुवात केली-

''ए आई, बघ ग, हा दादा कसा कलतोय तो पतंग मी घेतलाय म्हणून सांगतोय उगीचच्या उगीच.''

आई बाहेर येऊन मलाच रागं भरायला लागली तिच्याकडून मला समजलं की माझा एक पतंगच नाहीसा झाला नसून गेल्या तीनचार दिवसात आणखी एकदोन वस्तू बेपत्ता झाल्या आहेत

चंद्याचा रबरी चेंडू नि आईचा एक रेशमी रूमाल या वस्तूसुद्धा दिसत नव्हता. त्या अशा नाहीशा कशा व्हाव्या याचंच सर्वांना आश्चर्य वाटत होतं.

मग स्वस्थ राहाण्यावाचून मार्गच नव्हता: आमचा असला सुंदर बेत वाया गेल्याबद्दल चुटपुटत मी सुधीरबरोबर त्याचा छोटा पतंग उडविण्यासाठी मैदानावर गेलो.

संध्याकाळी घरी आलो तो हिरमुसलेलाच. माझं कशाकडेच लक्ष लागत नव्हतं. पतंग असा एकाएकी नाहीसा का व्हावा याचाच सारखा विचार करीत मी माझ्या अभ्यासाच्या टेबलावर डोकं टेकून राहिलो होतो.

''सर्रऽऽ फर्रऽऽ फर्रऽऽ जवळून कसला तरी आवाज येत होता. मी त्याकडे लक्ष देऊन ऐकू लागलो. जिन्याखालच्या पप्याच्या निजण्याच्या जागेकडून तो आवाज येत होता. मी पटकन उठलो नि विजेरी घेऊन कसला आवाज येत होता ते पाहाण्यासाठी तिकडे गेलो. तिथं गेल्यावर मला जे दृश्य दिसलं ते पाहून जितका राग आला तितकंच हसू लोटलं.

माझ्या आवडत्या पतंगाशी पप्या मजेनं खेळत होता. त्याच्या दांडगाईमुळं पतंगाची दुर्दशा उडाली होती. त्याची शेपूट तुटली होती. काड्या मोडल्या होत्या नि कागदाच्या चिंध्या झाल्या होत्या.

''अरे हरामखोरा!'' असं म्हणत मी पप्याच्या पाठीवर एक धबाका दिला. पण त्याला त्याचं काय होय? निर्लज्जासारखा शेपटी हालवीत तो माझ्याशी लडिवाळपणा करायला लागला. इतक्यात आई, स्वयंपाकीणकाकू, चंद्या ही सुद्धा तिथं आली.

माझ्या आवडत्या पतंगाची ती दशा पाहून ती हसतच सुटली. मग दिवा पुढे करून पप्यानं आणखी काय काय वस्तू या प्रयोगशाळेत आणल्या आहेत ते आई पाहू लागली.

तेव्हा तिचा रेशमी रुमाल नि चंद्याचा रबरी चेंडू ह्या हरवलेल्या वस्तूही तिथंच पडलेल्या दिसल्या. रुमाल माती लागून अगदी मळला होता नि पप्याचे दात लागून चेंडू एकदोन ठिकाणी फाटला होता.

यावेळी मला पप्याचा असा राग आला होता! पण मी तो सारा मुकाट्यानं गिळून त्याचींच बाजू घेतली. नाहीतर त्याची दुसऱ्याच दिवशी हकालपट्टी होण्याची भीती होती ना!

: ५ :

## खाशी खोड मोडली!

शेजारच्या रखमाकाकूंच एक मांजर होतं. त्याच्या रंगारुपाचं नि गुणाचं त्या नेहमी कौतुक करीत, पण आमच्या अनुभवाप्रमाणे ते पहिल्या प्रतीचं चोरटं होते. अगदी हलक्या पावलानं घरात येऊन ते केव्हा कशावर डल्ला मारून जाईल याचा नेम नसे. उघड्या राहिलेल्या खाण्याच्या जिन्नसांचा ते समाचार घेईच. पण शिंक्यावरल्या किंवा जमिनीवर चांगलं झाकणं घालून ठेवलेल्या वस्तूंचाही ते कधी कधी फडशा उडवीत असे.

एकदा त्यानं चुलीजवळ ठेवलेल्या चांगल्या दीड एक शेर

दुधावरलं झाकणं उडवून ते जमिनीवर सांडवलं होतं; नि दुसऱ्या एका वेळी त्यानं शिंक्यावर नीट ठेवलेला खरवसाचा डबा खाली पाडून त्याचा नाश केला होता.

चारपाच दिवसांपूर्वीच आम्ही एक पोपटाचं पिल्लू आणून पाळलं होतो. आमच्या चंद्याचा तर त्याच्यावर भारी जीव होता. त्याला त्या पोपटाचं अगदी वेडच लागलं होतं म्हणाना! मला मात्र त्याचं फारसं काही वाटत नसे; पण कधीमधी एकादी पेरूची फोड किंवा हरभऱ्याचे ओले दाणे मी त्याच्या पिंजऱ्यात टाकी.

एक दिवस मी असाच पोपटाला हरभरे घालण्यासाठी त्याच्या पिंजऱ्याकडे जात होतो तेव्हा रखमाकाकूंच मांजर जवळच बसून पिंजऱ्यातल्या पोपटाची अधाशीपणानं टेहळणी करीत होतं. माझा कधीपासून त्याच्यावर राग होता; नि आता त्याला पिंजऱ्याजवळ पाहाताच तो अनावर झाला.

चांगला बडगा त्याच्या डोक्यात घालून त्याचा कपाळमोक्ष करावा अस माझ्या मनात आलं; पण जवळपास लहानशी काठीही नव्हती. मग एकदम एक विचार सुचून मी पप्याला बोलावलं नि त्याला 'छू:' करून त्याच्या अंगावर घातलं. माझी युक्ती अगदी फत्ते झाली, पप्या त्याच्या अंगावर धावून जाताच त्याला पळता भुई थोडी झाली!

अन् तेव्हापासून असं झालं की ते मांजर आमच्या घराकडे आलं रे आलं की पप्या त्याच्या अंगावर धावलाच! पप्यानं आपण होऊनच त्याच्यावर चांगला पहारा ठेवला होता.

एके दिवशी सकाळी आमच्या गड्यानं पोपटाचा पिंजरा

धुण्यासाठी जमिनीवर काढून ठेवला नि आणलेलं पाणी संपलं म्हणून आणखी पाणी आणण्यासाठी मागीलदारी गेला. रखमाकाकूंच्या मांजराला ही चांगली संधीच मिळाली. तितक्यातच ते तिथं येऊन पिंजऱ्याचं दार उघडण्याचा प्रयत्न करू लागलं. पोपट भीतीमुळं मोठमोठ्यांनं किंचाळू लागला. मी ते ऐकून बाहेर आलो. पप्या माझ्या आधीच तिथे येऊन त्यानं मांजराच्या अंगावर झडप घातली होती. पण मोठ्या चपळाईनं निसटून ते जवळच्या शेवग्याच्या झाडाच्या आश्रयाला गेलं. पप्या झाडाखाली जाऊन उभा राहिला नि त्याच्या अंगावर जोराजोरानं भुंकू लागला.

मांजराची अगदी घाबरगुंडी उडाली. त्याला वर चढायला जमत नव्हतं नि दूर पळून जायलाही जमत नव्हतं. या संधीचा फायदा घेऊन मी त्याच्या पाठीवर काठीचे दोन तडाखे दिले नि पप्यानंही त्याला चांगलं लोळवलं. याचा परिणाम मात्र असा झाला की त्या दिवसापासून त्या मांजरांनं आमच्या घराकडे फिरकायचं साफ सोडून दिलं.

## : ६ :

## त्यादिवशीची आठवण

अलिकडे पप्याला एक विचित्र खोड लागली होती. मी कुठं घराबाहेर जायला निघालो की स्वारी माझ्याबरोबर येण्यासाठी

तयार! मला त्याला आपल्याबरोबर न्यायला मौज वाटत असे हे खरं. पण एकदा त्याला बरोबर नेल्यामुळे जी अद्दल घडली ती चांगली स्मरणात राहिल्यामुळे त्यानंतर पप्याला टाळण्याचाच मी नेहमी प्रयत्न करीत असे. ते असं झालं -

एकदा मी व माझा एक मित्र एका रविवारी बंदराच्या बाजूला फिरायला निघालो होतो. पप्याही आमच्याबरोबर निघाला होता. पहिल्यानं माझा मित्र पप्याला मागे पिटाळून लावीत होता. पण मीच त्याला बरोबर येऊ देण्याचा आग्रह धरला. अन् शेवटी पप्या आमच्या मागोमाग चालू लागला. आम्ही थोडेसे चालून गेलो नाही तोच पप्याला पाहून गावातील कुत्री आमच्या भोंवती जमू लागली. आम्ही त्यांना हाकून काढण्याचा खूप प्रयत्न केला. पण त्यांनी दाद दिली नाही. पप्याच्या अंगावरती सगळी अगदी तुटून येत होती. त्या साऱ्यांच्या अंगात एक प्रकारची लढाऊवृत्तीच संचारली होती.

पप्याची तर मोठी मौजच झाली. तो आमचा आश्रय घेत घेत त्यांच्यावर गुरगुरत पुढे सरकल्यासारखं करीत होता. पण बेट्याची अगदी पाचावर धारण बसली होती. आम्हाला तर ही नसती ब्याद बरोबर घेतल्याचा पश्चाताप झाला; पण काय उपयोग? ती कुतरडी काही जाईनात उलट गुरगुरून आणि भुंकून त्यांनी सगळी आळी दणदणून टाकली.

एवढ्या वेळात आजूबाजूची बरीच मुलं आमची गंमत पाहाण्यासाठी तिथं गोळा झाली. ती आमची नाना तऱ्हांनी टिंगल करायला लागली तेव्हा तर आम्हाला मेल्याहून मेल्यासारखं झालं. आता काय उपाय करून या अडचणीतून

बाहेर पडावं ते समजेना. अगदी केविलवाणी स्थिती झाली आमची, शेवटी या आपत्तीचं मूळच काढून टाकण्याची कल्पना मनात येऊन मी पप्यालाच दगडानं मागे पिटाळलं. तेव्हा लगेच सारी कुतरडी त्याचा पाठलाग करण्यासाठी त्याच्यामागे धावली. पप्याला त्यांच्या तडाख्यातून सुटून जाणं अशक्यचं होतं. शेवटी सडकेच्या एका अंगाला गटाराचा आश्रय घेत एकाद्या खंद्या रजपूत वीरासारखा तो आपल्या जातभाईंशी शौर्यानं लढू लागला. आम्ही दूर उभे राहून त्याला प्रोत्साहन देऊ लागलो.

''पप्या छू: ! पप्या छू:''

लवकरच एकाद्या मुत्सद्दी सेनानीप्रमाणे शिस्तीत माघार घेत पप्याने घराकडे धूम ठोकली. अन् आम्हीही त्याचं कौतुक करीत करीत पुढं चालू लागलो. आता आम्हाला किती मोकळं वाटत होतं!

: ७ :

## पप्या अन् प्राध्यापक पाहुणे

शाळा-कॉलेजांना आता नाताळाची सुटी पडली होती. या सुटीच्या निमित्तानंच आमच्याकडे एक प्राध्यापक पाहुणे आले होते. गृहस्थ मजकूरांना कुत्र्यामांजरांची भारी आवड. तशात आमच्या पप्याच्या अंगचा खिलाडूपणा पाहून पाहुण्यांना त्यांच खूप कौतुक वाटे. बंदराच्या वाळवंटात किंवा मैदानावर

आमच्याप्रमाणे तेही पप्याबरोबर खेळत असत.

दिवस इतका मजेत अन् भराभर जात होते की सुटी कशी संपत आली तेच समजेना. पाहुणे आज संध्याकाळी घरी परत जायचे होते म्हणून आज सकाळच्या वेळी आम्ही फिरायला गेलो होतो. सकाळच्या वेळचं बंदारावरचं वातावरण फारच मनोहर असतं. समुद्राचे पाणी त्यावेळी विलक्षण शांत असल्यामुळे त्याच्या पृष्ठभागावरून शांत मंद गतीनं दूरदूर जात असलेली मच्छिमारी जहाज कुणाचंही लक्ष वेधून घेतात. भरतीचं पाणी ओसरल्यावर काळसर वाळूवर दिसणाऱ्या लाटांच्या खुणा प्रेक्षकांच्या अंत:करणात कुतुहल निर्माण करतात. असली विविध दृश्य पाहाता पाहाता आम्ही इतके गुंग झालो होतो की आमची नजर चुकवून पप्या आमच्यापासून केव्हा दूर गेला ते आम्हाला समजलंच नाही.

अन् मग बराच उशीर झाला तेव्हा आम्ही घरी जायला निघालो. पप्याला तीनचार हाका मारल्या पण त्याचा पत्ता नाही. कदाचित तो आधीच घराकडे परतला असेल असं म्हणून आम्ही चालू लागलो.

आम्ही घरी येऊन पाहिलं; पण पप्या कुठंच दिसेना. मी आजूबाजूस त्याचा खूप शोध केला, पण व्यर्थ! शेवटी अगदी अकल्पित रीतीनं पप्याला मुकल्याबद्दल सर्वजण खूप चुटपुटलो.

पप्या असा एकाएकी नाहीसा झाल्याचं आमच्या आईला विशेष काही वाटलं नाही; पण मला नि त्याचप्रमाणे पाहुण्यांनाही खूप वाईट वाटलं.

संध्याकाळी चारचा सुमार झाला होता पाहुण्यांना

पावणेपाचच्या गाडीनं निघायचं होतं. म्हणून ते लगबगीनं निघण्याची तयारी करीत होते. सगळं ठाकठीक झाल्यावर ते पायात चढविण्यासाठी बूट पाहू लागले. पण मोठं आश्चर्य हे की जोडीपैकी एकच बूट जागेवर असून दुसरा कुठेच दिसत नव्हता. गाडीची वेळ होत आली होती. इतक्यात बूट सापडायलाच पाहिजे होता. म्हणून आम्ही सारेच इकडे तिकडे शोधू लागलो; पण बूट काही सापडेना!

''काय मेलं हे कुतरडं तरी!'' आमची मोलकरीण मागील दारानं पप्याला शिव्याशाप देत येत होती. पाहुण्यांचा हरवलेला बूट तिच्या एका हातात होता.

''म्हणजे? कुठे सापडला हा बूट?'' पाहुण्यांनी आश्चर्यचकित होऊन विचारलं.

''अहो, काय सांगू नवल! मागील दारी विहीरीजवळ टाकला होता कुणीतरी. बहुतेक ते पप्याचंच काम! मोलकरीण म्हणाली.

पाहुण्यांनी जेव्हा बूट हातात घेऊन त्याचं निरीक्षण केलं तेव्हा ते सर्दच झाले. पप्यानं दात लावून बुटाला दोनचार ठिकाणी ओरखडे काढले होते. आत ठेवलेल्या मोज्यांच्या पत्ताच नव्हता. हे सारं पाहून पाहुणे खूपच चरफडले.

गाडीची वेळ होत आली. आधी बोलावून ठेवलेली टॅक्सी दारात येऊन उभी राहिली. पाहुण्यांनी आपल्या बॅगमधील नव्या पायमोज्यांचा जोड काढून बूट चढविले नि सर्वांचा निरोप घेऊन ते टॅक्सीकडे जाऊ लागले.

''अरे वा:! हा आलाच!'' त्यावेळी तिथं आलेला सुधीर ओरडला.

कोण आलं हे पहाण्यासाठी आम्ही सडकेकडे पाहू लागलो. समोरून पप्या जीव तोडून धावत येत होता. त्याचं सर्वांग चिखलानं माखलं हेता. त्याला पाहाताच सर्वांना जितकं आश्र्चर्य वाटलं तितकाच आनंद झाला. पप्याच्या अपराधाबद्दल त्याला सर्वांनी क्षमा केली होती.

''शाबास पप्या! अगदी वेळेवर आलास पाहुण्यांना निरोप द्यायला!'' मी म्हटलं.

फार दिवसांनी दिसलेल्या मित्राला भेटायला उत्सुक व्हावं तसा पप्या सर्वांना भेटायला अधीर झाला होता. पाहुण्यांना समोर पाहून तो त्यांच्याकडे प्रथम धावला. त्याने मोठ्या प्रेमानं आपले पुढले पंजे वर उभारून त्यांच्या अंगावर टेकले. आता मात्र पाहुण्यांची स्थिती अतिशय केविलवाणी झाली. पप्याच्या आडदांडपणामुळे त्याच्या पंज्याचा चिखल लागून त्यांचा भारी कापडाचा सूट खराब झाला. पप्याची 'निरोप' देण्याची ही तऱ्हेवाईक रीत त्यांच्या कायमची लक्षात राहाण्यासारखी होती यात शंका नाही.


## : ८ :
# बैरागीबुवाची भंबेरी

परवाच आमच्याकडे आमची रोह्याची आत्या फार दिवसांनी आली होती. तिच्या धाकट्या मुलीसाठी - बीनाताईसाठी म्हणे अण्णानी एक स्थळ पाहिलं होत. म्हणून त्यासंबंधात विचारविनिमय करण्यासाठी त्यांनी तिला मुद्दाम बोलावून घेतलं होतं.

आमची ही आत्या मोठी प्रेमळ होती. आम्हा भाचरूंडांचे ती कितीकिती लाड करायची! आमच्या आईशीही तिचं छान जमायचं. मला वाटतं आईनंच तिला पप्याच्या उपद्व्यापांविषयी कायकाय सांगून. तिचं त्याच्याविषयी कलुषित मत केलं होतं. मी काल शाळेतून आल्यावर पप्याशी खेळू लागलो. जरा त्याचे लाड करू लागलो. तेव्हा आत्या मला म्हणते कशी.

''अरे दीपक काय हे? त्या कुतऱ्याशी इतकी सलगी बरी नाही. आरोग्यशास्त्र शिकला आहेस ना?

''शिकलो आहे ग. पण कुत्र्याइतका इमानी आणि मायाळू प्राणी दुसरा नाही. शिवाजी महाराजांचाही एक लाडका कुत्रा होता, हे माहीत आहे का तुला?'' मी ठासून



विचारलं.

''अरे होरे बाबा. पण तू काय स्वत:ला प्रतिशिवाजी समजतोस की काय?'' आत्यानं उलट मलाच विचारलं

''जय शंकर! जय भोलानाथ!''

जोरदार पुकार ऐकू आला नि आमचं संभाषण इथंच थांबलं.

दारात एक गोसावी बुवा आला होता अंगात भगवी कफनी, खाली त्याच रंगाच मळकट धोतर, कपाळावर नि दोन्ही दंडावर भस्माचे पट्टे, डोक्यावर अगडबंब जटाभार, चेहऱ्यावर दाढीमिशींचं लेणं, गळ्यात रुद्राक्षांच्या माळया,

हातात कमंडलू असं भोळ्या भाबड्यांवर एकदम छाप पाडणारं ध्यान होत त्याचं. अर्थात आमच्या आत्यावर बुवाची छाप पडायला वेळ लागला नाही हे सांगायला नकोच.

आत्याला समोर पाहाताच बुवाची बडबड सुरू झाली -

''माई, तू मोठ्या भाग्याची आहेस. मन तुझं फार मोठं' सागरासारखं आहे. पण सध्या जरा चिंतेत आहेस. पण काळजी करण्याचं कारण नाही....

आत्याला भविष्याचं भारी वेड. तशात अलिकडे बीनाताईच्या लग्नाच्या विवंचनेनं तिचं हुळहुळं झालेलं मन भविष्याकडे जास्त जास्त आकर्षित झाल्यास नवल नाही. त्यामुळे दारात आलेल्या बुवाच्या बडबडीकडे ती आस्थेनं लक्ष देऊ लागली. मात्र आमच्या पप्याला हे मुळीच मंजूर नव्हतं असे दिसतं. त्यानं संशयीपणानं बुवाकडे दृष्टिक्षेप टाकून त्याच्यावर गुरगुरण्यास नि भुंकण्यास सुरुवात केली.

''जळलं मेल्याचं लक्षण! दीपक-बाळा, त्या कुतरड्याला घेऊन जा दूर.'' खूप वैतागून आत्यानं मला फर्मावलं नि बुवाची भीती दूर करून त्याला बसायला सांगितलं.

मला बुवाची गंमत पाहाण्यासाठी तिथं थांबायचं होतं, म्हणून पप्याला चुचकारून गप्प बसविलं नि तिथंच थांबून राहिलो

आता बुवाच्या रसवंतीला बहर आला होता. आत्यासारखं भाबडं गिऱ्हाईक त्याला फार दिवसांनी भेटलं असावं. त्याचं

बडबड पुन्हा सुरू झाली

''माई, तू आजपर्यंत दुसऱ्यासाठी खूपखूप केलं; पण तू कोणाची कधी एक पैशाची ओशाळी नाही. माई, तुझी पुण्याई फार मोठी आहे. तुला आता लवकरच तीर्थयात्रा घडणार आहे. तुझ्या हातून पुष्कळ दानधर्म होणार आहे माई....

बुवा आत्याला हरभऱ्याच्या झाडावर चढवीत होता अन् आत्याही हुरळून गेली होती. इतक्यात आई घरातून बाहेर आली नि कौतुकानं सारा प्रकार पाहात उभी राहिली. मग बुवानं आमच्या आईकडे मोर्चा वळविला. त्यानं निरनिराळी विशेषण वापरून आमच्या आईच्या दातृत्वाची, भाविकपणाची नि कनवाळूपणाची वर्णन सुरू केली, तेव्हा मला हसू आवरेना. आईन मला डोळयांनी दाटवून गप्प राहायला सांगतिलं.

त्यानंतर आत्यानं बुवाला भविष्यविषयक दोन-तीन प्रश्न विचारले. त्यात आपल्या मुलीच्या लग्नाबाबतही एक प्रश्न आत्यानं विचारला होता. बुवांन मोठया चतुराईन त्या सर्वांची उत्तर दिली अन् आत्या बुवाच्या अचाट द्रष्ट्येपणावर बेहद्द संतुष्ट झाली. एवढी पार्श्वभूमी तयार झाल्यावर बुवानं आत्याकडे शिध्याची नि दक्षिणेची मागणी केली. आत्यानं डाळ, तांदूळ अन् सव्वापाच रुपये दक्षिणा देऊन बुवाची मनिषा पूर्ण केली.

एवढ्या वेळात सुधीर आणि त्याचे एकदोन मित्र मला

खेळायला बोलावण्यासाठी तिथं आले. बुवाला पाहाताच त्यांनी त्याची टिंगल करंण्यास सुरूवात केली.

मग बुवा आपलं चंबूगबाळं आवरून जाऊ लागताच एवढा वेळ थोपवून धरलेल्या पप्यानं त्याच्यावर जोराजोरानं भुंकण्यास सुरूवात केली. बुवाला वाटलं, आपण सुटलो; आता हे कुतरडं काय करणार? फाटकाकडे जाता जाता बुवानं हाड्हाड् करीत आपल्या हातातली काठी पप्यावर उगारली. झालं. लागलीच पप्यानं चवताळून त्याच्या अंगावर उडीच घेतली. बुवाला ब्रम्हांड आठवलं. त्यानं पप्याला आवरण्यासाठी आमच्यापाशी गयावया करण्यास सुरुवात केली; पण कुणीही त्याकडे लक्ष देईना. उलट सुधीरनं पप्याला बुवाच्या अंगावर छूः करून त्याला भडकावले. मग काय पप्याला तेवढंच पुरे झालं. बंद फाटकाकडे अडकलेल्या बुवावर पप्यानं जोरदार हल्ला केला. त्याचं धोतर दातांनी धरून जोरजोरानं ओढण्यास सुरूवात केली घरातून आई नि आत्या बाहेर येऊन पप्याला आवरण्याविषयी आम्हाला परोपरीनं सांगत होत्या; पण त्यांच्या ओरडण्याकडे कुणीच लक्ष दिलं नाही.

इतक्यात एक चमत्कार घडला. पप्यानं बुवाच्या नेसत्या धोतराची खेचाखेच करताना धोतरातून एक मनगटी घड्याळ खाली जमिनीवर पडलं; तेव्हा बुवाची अगदी तिरपीट उडाली. याचवेळी ऑफिसातून अण्णा घरी आले. त्यानी सर्व प्रकार समजाऊन घेतला. नि बुवाला ताब्यात घेतलं. मग

अण्णानी बुवाला चांगला दम दिल्यावर त्यानं आपण ते घड्याळ दुपारी कुठं अन् कसं चोरलं ते सांगितलं नि माफी करण्यासाठी अण्णांचे पाय धरले. पण अण्णांनी त्याला माफी तर केली नाहीच, उलट त्याची रीतसर पोलीस ठाण्यावर रवानगी केली. हे सांगायला नकोच.

पप्याच्या आजच्या पराक्रमाबद्दल आम्ही सर्वांनी त्याची पाठ थोपटली, नि त्याचं खूप कौतुक केलं.

: ९ :

## पप्या जाणार कारे तू?

दिवसामागून दिवस जात होते. रोज काहींना काही आगळीक पप्याकडून व्हायचीच! मी दरवेळी पप्याची बाजू घेऊन बोलत असे. पण पुढे पुढे मीसुद्धा जेरीस आलो.

एक दिवस पप्याने उन्हात ठेवलेली दोनतीन रत्तल गुलकंदाची भरलेली बरणी मेजावरून खाली पाडून तिच्या ठिकऱ्या ठिकऱ्या केल्या. दुसऱ्या एकावेळी दरवाजे व खिडक्या यांना लावण्यासाठी आणलेला रंगाचा डबा लवंडून सारा रंग धुळीस मिळविला नि रंगाऱ्याचा निष्कारण खोळंबा केला. या प्रसंगी सर्वांग रंगानं माखवून पप्यानं आमची भरपूर करमणूक केली हे खरं; पण तेवढ्यानं आमच्या

घरच्या वडील मंडळीचं त्याच्याविषयी कलुषित झालेलं मत सुधारलं नाही.

वरच्या सारखे गंभीर अपराध पप्याकडून नेहमी होत नसले तरी आल्या गेल्या माणसावर धावून जाणं, वेळीअवेळी भुंकत राहून डोकं उठवणं, जेवणाची थाळी आणणाऱ्या गड्याच्या अंगावर अधाशीपणानं उड्या मारणं असले लहानसहान अपराध तर त्याच्याकडून हरघडी घडत.

अन् यामुळेच घरातली सगळी माणसं त्रासून गेली होती. पप्या कुणालाही डोळ्यासमोर सुद्धा नकोसा झाला होता. पण मला मात्र त्याची भारी कीव यायची. त्याचा स्वभाव खेळकर होता नि तो जी जी गोष्ट करी ती त्याच्या स्वभावाला अनुसरूनच. पण त्याचं दुर्दैव असं खडतर होतं की ती ती गोष्ट त्याच्या आंगलटी येऊन त्याच्या विषयी लोकांचं मत वाईट होई.

अलिकडे आमच्या घरात पप्याला दूर नेऊन सोडण्याची भाषा जोरात सरु झाली होती. ती ऐकून फार वाईट वाटे मला. पण त्याचा काय उपयोग? कारण पप्याची बाजू दरवेळी इतकी लंगडी असे की त्या बाजूनं केलेलं माझं समर्थन अगदी दुबळं ठरून त्याचा काहीएक उपयोग होत नसे.

आता मात्र मला पप्याची आशा सोडणं भाग पडलं, कारण पप्याला हद्दपार करण्याची भाषा इतके दिवस स्वयंपाकघरातच चाले; पण आता खुद्द आमचे अण्णाही ती

बोलू लागले. इतकंच नव्हे तर खेड्याहून शेतावरली कुळं आली म्हणजे त्याच्याकडून त्याला दूर नेऊन सोडण्याचंही त्यांनी नक्की ठरवलं.

आता मात्र माझा धीर सुटला.

एक दिवस दुपारी मी पप्या निजला असता त्याच्या जवळ जाऊन भावनातिरेकानं त्याच्या पाठीवर हात फिरवीत राहिलो. त्यावेळी तो इमानी कुत्रा ताडक्न उठून कूंऽऽकूंऽऽकूंऽऽ असा तोंडानं आवाज काढीत माझ्या हाताशी खेळू लागला. आपल्यावर कोणती आपत्ती येणार आहे याची त्या बिचाऱ्याला थोडीदेखील कल्पना नव्हती. त्याचा निष्पाप चेहरा पाहून मला अधिकच भडभडून आलं. त्याला पोटाशी धरून दाटल्या कंठानं मी त्याला म्हटलं,


''पप्या, पप्या, आता तू मला सोडून जाणार कारे?''

माझ्या डोळ्यातून अश्रू ओघळू लागले.

## : १० :

## अजब चमत्कार

माझी थोरली बहीण दोनतीन दिवसांपूर्वी आपल्या मुलांना घेऊन फार दिवसांनी माहेराला म्हणून इकडे आली होती. माझ्या प्रमाणेच तिच्या दोन्ही मुलांना पप्या भारी



आवडू लागला होता. खुद्द ताईचं पप्याविषयी काय मत असावं ते सांगता येत नव्हतं. पण आईच्या मताचा परिणाम होऊन तिचं मतही त्याच्याविषयी वाईटच असण्याचा फार संभव.

ताईचा तीनचार वर्षांचा शरद भारी अवखळ होता. त्याची लवकरच पप्याशी गट्टी बनून गेली. तो पप्याचे कान ओढी, शेपूट ओढी, त्याच्या पाठीत धबाधबा मारी. पण पप्या त्याला बिलकूल विरोध न करता उलट त्याच्याशी खेळत असे. शरदही त्याला बिस्किटं, शेव, चकली वगैरे जे जे मिळे ते ते पप्याला चारीत असे. त्यामुळे पप्या नेहमी त्याच्या अवतीभवतीच असायचा.

एक दिवस सकाळच्या वेळी शरद अंगणात खेळत होता.

बागेचं फाटक उघडं होतं. त्यातून तो केव्हा बाहेर सडकेवर गेला ते कुणाच्याच लक्षात आलं नाही. सकाळच्या वेळी रोज गावातील गाईम्हशी समोरच्या रस्त्यानं चरायला जात असत. यावेळीही गाईम्हशी येत होत्या. त्यांना पाहून शरदला खूप आनंद झाला. सडकेवर उभा राहून तो आपले चिमुकले हात हालवून त्यांना बोलावू लागला.

इतक्यात काय झालं कुणास ठाऊक! एक म्हैस बेफामपणे उधळून त्याच्या बाजूला धावून येत होती. आता भयंकर मोठा अपघात व्हावयाचा होता, पण तो अचानकपणे टळला. म्हैस शरदच्या रोखानंच दौडत असलेली पाहून जवळच असलेला पप्या तिच्या अंगावर वाघासारखा धावला. भूंकून भूंकून त्याने सारी आळी दणाणून टाकली म्हशीला पुढे पाऊल टाकण्याची हिंमतच होईना. पप्याला जोराजोरानं भुंकताना ऐकून ताई नि आई अशा दोघीही सडकेकडे आल्या. बेफाम झालेल्या म्हशीला बाजीप्रभूच्या शौर्यानं थोपवून धरून शरदचा जीव वाचविणाऱ्या पप्याला पाहून दोघींनाही गहिवरून आलं. ताईनं शरदला उचलून घेऊन त्याचे पटापट मुके घेतले, नि पप्याकडे मोठ्या कृतज्ञतेने पाहिलं. आईनं पप्याला जवळ घेऊन प्रेमानं कुरवाळलं.

झालं. त्या दिवसापासून पप्याचं दुदैव संपलं. तो सर्वांना आवडू लागला. आईची तर त्याच्यावर खूप माया जडली. अण्णांचं ही त्याच्या विषयी चांगलं मत होऊन त्यानी त्याला घालवून देण्याचा विचार सोडून दिला.

आता प्रत्येक जण त्याची दक्षतेनं काळजी घेऊ लागला. अन् त्यामुळेच कि काय पप्याचे गुण सुधारून तो शेजाऱ्या-पाजाऱ्यांनाही आवडू लागला.

---

म. सं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
BVBK-0402839

# आमची काही प्रकाशने

| | | |
|---|---|---|
| नाथमाधव माला | | १६ पुस्तकांचा संच |
| शरत् साहित्य | | २४ पुस्तकांचा संच |
| बंकिम साहित्य | | १२ पुस्तकांचा संच |
| उजळल्या प्रभा दशदिशा : कॅ. वासुदेव बेलवलकर | | रु. १००.०० |
| प्रतारणा : सौ. शैलजा राजे | | रु. २५.०० |
| सर्वसाक्षी : सौ. शकुंतला गोगटे | | रु. २५.०० |
| धूमकेतू : श्री. ज. जोशी | | रु. २५.०० |
| धन्य अंजनीचा सुत : आनंद साधले | | रु. २५.०० |
| सर आली धावून : कमल राजाज्ञा | | रु. २५.०० |
| सरोज : सौ. वंदना जोशी | | २५.०० |

# नवीन प्रकाशने

| | |
|---|---|
| कुठेकुणाच्या घडल्या भेटी : वसुंधरा देवस्थळी | रु. ३०.०० |
| एक नजर (आयुर्वेद) : डॉ संजय देवी | रु. २०.०० |

# कुमार वाङ्मय

| | |
|---|---|
| नाचणारी भुते व इतर कथा : जगदीश काबरे | रु. १८.०० |
| कथाबोध : जगदीश काबरे | रु. १८.०० |
| अवकाशयात्री : जगदीश काबरे | रु. १८.०० |
| जिज्ञासा : जगदीश काबरे | रु. १८.०० |
| अतुट नाते रक्ताचे : जगदीश काबरे | रु. १८.०० |
| एक सुंदर लाकडी खुर्ची : म. भा. माईणकर | रु. १८.०० |
| पराक्रमी पप्या : म. भा. माईणकर | रु. १८.०० |